नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/05/2023 (सोमवार) सकाळ

# नागपूर जिल्हयात लोखंड व कंपनीतील सुटे भाग चोरी करणारे सराईत गुन्हेगारांची टोळी हद्दपार

पो.स्टे. बुट्टीबोरी येथील सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख १) मौसीन अब्दुल बेरा २) अतुल रंगलाल लालसरे ३) शाहरूख बाबर पठान ४) फिरोज इब्राहीम खान यांना कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये ६ महिन्याकरीता हद्दपार.

पोलीस स्टेशन बुट्टीबोरी व एमआयडीसी बुट्टीबोरी जिल्हा नागपूर ग्रामीण हद्दीमध्ये आपले गुन्हेगारी प्रवृत्तीने दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख १) मौसीन अब्दुल बेरा, वय ३५ वर्ष २) फिरोज इब्राहीम खान, वय २८ वर्ष ३) शाहरूख बाबर पठान, वय २८ वर्ष सर्व रा. जुनी वस्ती बुट्टीबोरी जि. नागपूर ४) अतुल रंगलाल लालसरे, वय ३७ वर्ष रा. सातगाव ता. हिंगणा जि. नागपूर यांचे विरुध्द नागपूर ग्रामीण पोलीसांनी कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये कार्यवाही करुन त्यांना ६ महिन्याकरीता करीता नागपूर शहर व नागपूर जिल्हा ग्रामिण हद्दीतुन हद्दपार केले आहे.

सदर आरोपी हे टोळीने एकत्र येवुन पोलीस स्टेशन बुट्टीबोरी व एमआयडीसी बुट्टीबोरी परीसरातील कंपनीतील लोखंड व कंपनीतील सुटे भागाची (स्पेअर पार्ट) अवैद्यरीत्या चोरी करून त्याची विक्री करीत होते. त्याबाबत सदरचे आरोपीतांवर पो.स्टे. बुट्टीबोरी व एमआयडीसी बुट्टीबोरी येथे कंपनीतील लोखंड व कंपनीतील सुटे भागाची (स्पेअर पार्ट) चोरीचे सबंधाने एकूण ०७ गुन्हे नोंद असल्याचे निर्देशनास आले आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील राहणाऱ्या लोकांचे, कंपनीची सुरक्षा करीत असलेले सुरक्षारक्षक व कंपनी व्यवस्थापकांच्या मनामध्ये प्रचंड दहशत निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व कंपनीचे मालमत्तेस धोका निर्माण झालेला होता. त्यामुळे सदर आरोपीतांचे कृत्ये लक्षात घेता त्यांचे गुन्हेगारी कृत्याला आळा बसविण्याकरीता सराईत गुन्हेगारांचे टोळी विरुध्द कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयांतर्गत श्री. विशाल आनंद पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण यांनी दि. ०९/०५/२०२३ रोजी त्यांचे विरूध्द नागपूर शहर व नागपूर जिल्हा ग्रामीण हद्दीतुन ६ महिन्याकरीता हद्दपारीची कारवाई केलेली आहे. सदरचा प्रस्ताव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, प्रतिबंधक सेलचे पोउपनि श्री भारत थिटे, पोलीस हवालदार श्री विजय डोंगरे व निलेश बर्वे यांच्या सहकार्याने केली आहे.

## बॅटरी चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा मेंडकी शिवार येथे दिनांक ०२/०५/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक ०६/०५/२०२३ चे १६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रोहित सुभाष नागदेवे, वय २२ वर्ष, रा. पारडसिंगा ता. काटोल जि. नागपूर हे जिओ कंपनी येथे खाजगी नोकरी करीत असुन टेक्निशिअन या पदावर आहे तसेच टावरचे देखरेख करण्याचे काम करतात घटना ता. वेळी यातील फिर्यादी हे मेंडकी शिवारातील I-MH-KTOL-ENB-6003 टावर येथे यातील फिर्यादी यांनी घटने तारखेला भेट दिली असता ओडीसीचे दार उघडे दिसले तसेच आतमध्ये जावुन बघितले असता, टावरला चालु ठेवण्याकरीता COSLIGHT 100 AH कंपनीची बॅटरी किंमती अंदाजे ३६,०००/— रु. कोणीतरी अज्ञात चोराने बॅटरी चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक संतोष राठोड मो. नं. ८६६८२८४५६८ हे करीत आहे.

## लोखंडी पाइप चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा भानेगाव वार्ड क्र. ०२ येथे दिनांक १४/०५/२०२३ चे ००/३० वा. दरम्यान **आरोपी नामे— अल्केस नरेश निकोसे, अधिक २ इसम रा. भानेगाव** यांनी संगनमत करून वाहनामध्ये दोन लोखंडी चॅनल किंमती अंदाजे १५,०००/—रु. व एक लोखंडी पाईप किंमती अंदाजे ५०००/—रु. असा एकुण २०,०००/—रूपयाचा मुद्देमाल चोरी करून घेवुन जातांना मिळुन आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रवि नारायण सिंगम, वय ३५ वर्षे रा. वार्ड क्र. ०३ उपासे ले आउट भानेगाव यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ./११९ पवार पो.स्टे. खापरखेडा मो. नं. ८०८००८८५२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**